# ज्ञान प्रबोधिनी शैक्षणिक साधन केंद्र

## ई-प्रशिक्षक

वर्ष २ : अंक ४ / जानेवारी २०१५











चित्रपटांचा अध्यापनात वापर



'जाणता राजा : एक महाप्रकल्प'



पुस्तक परिचय

www.erc-pune.org

# संपादकीय

सस्नेह नमस्कार

२१ व्या शतकातील शाळा कशा असतील यावर खूपच चर्चा होते आहे. Smart Schools चा बोलबाला होतो आहे. संगणकाचे डेस्क टॉप, लॅपटॉप प्रकार आता जुने होऊन त्यांची जागा टॅब्लेट्सनी घेतली आहे. इंटरनेटचा वेग वाढल्यामुळे साध्या मोबाईल हँडसेट्सना काहीच किंमत राहिली नाही. ज्याच्या त्याच्या हातात 'स्मार्ट फोन' दिसू लागले आहेत. हे लोण अर्थातच मुलांपर्यंत पोहोचलेच आहे. वाढती connectivity ही शिक्षणाच्या गुणवत्तेला लाभदायकच आहे. परंतु करमणूकीच्या दिशेने जाणारी माध्यमे पाहता या साधनांचा शैक्षणिक उपयोग किती होईल हे सांगता येत नाही. १६ मी. मी. चित्रपट प्रक्षेपकांपासून प्रारंभ झालेल्या दृक्श्राव्य माध्यमांनी एल. सी. डी. प्रक्षेपक आणि स्क्रीन्सचा टप्पा केव्हाच ओलांडला आहे. आज स्मार्ट बोर्डस्चा जमाना आहे. या सर्व तंत्रज्ञानातील कळीचे उपकरण संगणकातील प्रोसेसर आहे. त्याचा वेग वाढतो आहे. इंटरनेटची बँडविड्थ वाढते आहे आणि क्लाउड तंत्रज्ञानाने माहिती साठवून ठेवण्याची आणि तत्काळ वापरण्याची क्षमताही वाढते आहे.

हे सारे पाहता आवश्यकता आहे ती हे तंत्रज्ञान वापरून अध्ययन-अध्यापनाची गुणवत्ता कशी वाढवायची. कारण शेवटी अध्ययन होणार आहे ते मुलांच्या मेंदूद्वारे! मूल संवेदनशील बनणे. विचार करायला शिकणे आणि त्याआधारे स्वतंत्ररित्या निर्णय घ्यायला शिकणे महत्त्वाचे यासाठी या साऱ्या माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग व्हायला पाहिजे!

माहिती तंत्रज्ञान शिक्षणात वापरताना विद्यार्थ्यांच्या दृष्टीने शिक्षण कृतीशील (active) कसे होईल ते पाहिले पाहिजे. चित्रे, छायाचित्रे, चित्रपट पाहताना जर त्या सत्रापूर्वीच्या, सत्रा दरम्यानच्या किंवा सत्रानंतरच्या कृतीची (वैचारिक, चर्चात्मक किंवा प्रत्यक्ष) योजना केली नाही तर या सत्रांमध्ये अध्ययन होईलच असे नाही. दृक्श्राव्य साधने आणि माहिती तंत्रज्ञानाची ताकद आभासी जग निर्माण करण्याची आहे. ॲनिमेशन आणि सिम्युलेशनची तंत्रे वापरून आपण शिक्षणातली interactivity वाढवू शकलो तर शैक्षणिक कार्यक्रमही व्हिडीओ गेम्सइतकेच मनोरंजक होऊ शकतील यात शंका नाही.

प्रा. विवेक पोंक्षे

चित्रपट हा सगळ्याच वयोगटांमधला आवडता विषय. झगमगते स्पेशल इफेक्ट्स, दे दणादण मारामारी, उडत्या ठेक्यांची गाणी व आवडते कलाकार ह्यामुळे विद्यार्थ्यांना देखील चित्रपट वारंवार बघायला, त्याची नक्कल करायला, त्यातील गाणी गायला आवडतात. अतिशय सहजपणे चित्रपटांचा असलेला प्रभाव शाळेमध्ये दिसू शकतो.

पण ह्याच चित्रपटांचा उपयोग जर शिकवण्यासाठी केला तर? चित्रपटगृहांची मजा जर वर्गात आली तर मुलांना ते नक्कीच आवडेल आणि अभ्यासातला त्यांचा रसही वाढेल. अनेक विषय जसे भूगोल, इतिहास, जीवशास्त्र, इंग्रजी ह्या विषयांतील गोडी वाढविण्यासाठी चित्रपटांची नक्कीच मदत होऊ शकते. राजा शिवछत्रपती या टीव्हीमालिकेचा आधार घेऊन शिवाजी महाराजांच्या जीवनातील अनेक प्रसंग जिवंत करता येतील. 'स्पायडरमॅन २' चित्रपटातील काही भाग दाखवून सूर्याच्या गाभ्यामधील घडणाऱ्या प्रक्रियांबद्दल सांगता येईल. 'द डे आफ्टर टुमॉरो' मधून पर्यावरणविषयक संकल्पना कळू शकतात. 'ज्युरासिक पार्क' मधील सुरुवातीचा काही भाग वापरून जनुकांविषयी शिकवता येऊ शकते.

वर्गात चित्रपट दाखवून शिकविताना प्रथम करावयाची गोष्ट म्हणजे आपल्या विषयाप्रमाणे योग्य तो चित्रपट, लघुपट, माहितीपट मिळविणे. चित्रफिती निवडताना पुढील मुद्यांचा विचार करावा.

१.उपलब्ध वेळ
२.उपलब्ध साधने
३.कोणते प्रश्न विचारता येतील?
४.चर्चा किंवा संवाद कसा घडवता येईल?
५.मुलांसाठीच्या प्रेरणा व आनंद

अनेक उत्तम चित्रपट, दूरदर्शन मालिका या उत्तम पुस्तकांवर वर आधारलेल्या असतात. 'भारत-एक खोज' ह्या पंडित नेहरूंच्या पुस्तकावर इतिहास शिकविण्यासाठी अत्यंत उपयुक्त अशी चित्रमालिका तयार झालेली आहे. 'ओमकारा', 'मकबूल' असे शेक्सपियरच्या पुस्तकांवर आधारित चित्रपट हिंदीमध्ये गाजले आहेत. मराठीमध्ये 'जैत रे जैत', 'सिंहासन', 'बनगरवाडी', 'शाळा' अशा अनेक चित्रपटांचे मूळ उत्तम पुस्तकामध्ये आहे.

बऱ्याचदा आपल्या विषयातील काही आशय चित्रपटांमध्ये असेल हेच शोधणे अवघड असते. यांसाठी काही वेबसाईटच्या लिंक खाली दिल्या आहेत. तेथे आपल्या विषयानुसार वर्गीकरण केलेले चित्रपट तुम्हाला दिसतील.

www.filmeducation.org/resources/secondary/
www.kidsreads.com/
www.teachwithmovies.org/index.html

जरी आपल्याला हवा असलेला भाग हा काही मिनिटांचाच असला तरी अनेकदा पूर्ण लांबीचा चित्रपट डाऊनलोड करावा लागतो. अशा वेळेस संपूर्ण चित्रपट दाखवणे व्यवहार्य नसल्यामुळे युट्यूबवर हव्या असलेल्या चित्रफितीच्या भागाचा शोध घेणे अपरिहार्य ठरते. असे अनेक चित्रपट १०-१२ भागांमध्ये उपलब्ध असतात. पण जर नसेल तर ह्यासाठी काही एडिटिंग सॉफ्टवेअर वापरता येतील. windows movie maker सारख्या सॉफ्टवेअरचा उपयोग करून त्या चित्रफितीतील आपल्याला हवा तेवढा भाग काढून घेता येतो. हे सॉफ्टवेअर मुळातच आपल्या संगणकावर असते. जर नसल्यास खाली त्याची लिंक दिली आहे.

Download:http://windows.microsoft.com/en-/windows-live/download-windows-essentials#wetabs=we2012

तसेच वापरण्यासंबंधी मार्गदर्शनपर सूचनांची लिंक दिलेली आहे.

tutorial: www.windows:microsoft.com/en-in/windows-live/movie-maker

चित्रफितीचा भाग शोधून किंवा एडिटिंग करून मिळवल्यावर ती आपल्या संगणकावर व्यवस्थित चालवण्यासाठी काही मीडिया प्लेयर्स लागू शकतात. VLC media player किंवा MPC media player हे बहुतेक सर्व format मधील चित्रफिती चालवू शकतात. त्यांची लिंक खाली देत आहे.

www.videolan.org/vlc/index.html
www.mpc-hc.org/

असा चित्रफितीचा भाग व मीडिया प्लेयर आपल्याला मिळाल्यानंतर वर्गात दाखवताना मात्र बरेच साहित्य बरोबरीला लागू शकते. त्याची एक यादीच आपण करूया.

१.संगणक/लॅपटॉप
२.प्रोजेक्टर, प्रोजेक्टर ते संगणक जोडणारी वायर
३.ध्वनिवर्धक (स्पीकर्स)
४.योग्य प्रकाशनियंत्रण असलेली वर्गखोली

हे सर्व साहित्य मिळवून ते सर्व व्यवस्थित चालू आहे ना हे आधी तपासून बघावे. नाहीतर तासामध्ये जोडणी करण्यात वेळ जाऊ शकतो व आपण केलेले नियोजन वाया जाऊ शकते.

चित्रपटाचा अध्यापनासाठी वापर करताना विचारात घ्यावयाचे मुद्दे –

१.संपूर्ण चित्रपट दाखविणे गरजेचे आहे का?
२.विषयातील कोणती संकल्पना दाखविण्यासाठी हे माध्यम प्रभावी ठरेल?
३.चित्रफितीच्या आशयानुरूप कोणता भाग निवडायचा ह्याचे निकष.
४.नक्की काय पाहायचे याच्या सूचना कशा देणार?
५.कोणता भाग समजण्यासाठी २–३ वेळा परत दाखवावा लागेल?
६.चित्रफित आशय/ संकल्पना स्पष्ट करण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता निर्माण करण्यासाठी उपयुक्त ठरेल का?

वर्गात चित्रपट दाखविल्यानंतर मात्र तासाचे नियोजन भरभक्कम असावे नाहीतर चित्रपट पाहिल्याच्या धुंदीत मुले शिकण्याच्या गोष्टीकडे दुर्लक्ष करू शकतील. विज्ञानविषयक चित्रफितीचा भाग बघितल्यावर त्यावरील एखादी प्रश्नमालिका सोडवायला देणे असे आपण करू शकतो. इंग्रजी शिकविताना दोन व्यक्तींचे संभाषण असलेला चित्रफितीचा भाग मधेच थांबवून पुढील संभाषण आपल्या मनाने मुलांनी लिहावे असे सांगू शकतो. ऐतिहासिक चित्रफितीचा भाग बघितल्यावर व्यक्ती आणि व्यक्तीचित्रे ह्यांच्याविषयी मुलांना काय वाटले ते त्यांनी लिहावे असे पाठ नियोजन ठरवू शकतो.

दृक्श्राव्य माध्यमांचा प्रभाव आपल्याभोवती प्रचंड प्रमाणात आहेच. त्यांचा आपल्या शिक्षणात सहभाग करून घेणे हे आता क्रमप्राप्त आहे. मुलांना संकल्पना कळायला व विषयातील आवड वाढायला ह्याचा उपयोग नक्कीच होईल.

**ओंकार प्रधान**
ज्ञान प्रबोधिनी फिल्म क्लब, पुणे


## Volcano


A rupture on the crust of a planetary mass object, such as the Earth, which allows hot lava, volcanic ash, and gases to escape from a magma chamber below the surface.


**Key words :** Volcano, magma , lava , ring of fire, hot spot, pipe , vent , crater , eruption , dormant , Geothermal activity

**While Using movie clips :**
**Positive points:**
Help to get attention & stimulation
Visual representation of volcano
Discussion on pre eruption effects
Depiction of explosive eruption

**Misconceptions:**
Running through lava
All volcanos erupt as shown in the film










# ‘जाणता राजा : एक महाप्रकल्प’

विद्यार्थ्यांना त्यांच्या त्यांच्या क्षमतांनुसार उपक्रमांमध्ये गुंतवणं, त्यांच्याकडून अपेक्षित काम करून घेणं, त्यांना अभिव्यक्त व्हायला देणं आणि पुन्हा हे सगळं आनंददायी असणं या साऱ्या पैलूंचा विचार करून आमच्या न्यू इंग्लिश स्कूल, रमणबाग या शाळेत एक आगळंवेगळं धाडस करायचं ठरवलं. पूर्णपणे विद्यार्थी केंद्रित आनंददायी शिक्षण हा उद्देश ठेवून, आकारिक आणि सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन पद्धतीचा, मोठ्या खुबीने वापर करून वर्षभरासाठीचा एक ‘महाप्रकल्प’ म्हणून ‘जाणता राजा’ हे शिवचरित्राचा संस्कार करणारं महानाट्य २५५० विद्यार्थी, शिक्षक,पालक यांच्यासह करायचं ठरवलं.

जाणता राजाची संहिता शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांची आणि ती नाट्य, नृत्य, संगीत, कृती अभिनय, नेपथ्य, भव्यदिव्य विचार आणि संवाद यांनी युक्त अशीच आहे. स्नेह संमेलनाला हे महानाट्य बसवायचं ठरवलं. एवढा मोठा कार्यक्रम करताना नियोजन काटेकोर, विचारपूर्वक करणं महत्त्वाचं होतं. ही तयारी वर्षभर शाळा, परीक्षा, अध्ययन, अध्यापन सांभाळून करणं ही तारेवरची कसरतच!

संकल्पना व नियोजन ह्या संदर्भात शिक्षक-मुख्याध्यापक अशा असंख्य सभा झाल्या. शिक्षकांमार्फत पालक आणि विद्यार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन केलं गेलं. अनेकदा सर्व विद्यार्थी-शिक्षक-पालक यांना एकत्रित नियोजनासाठी बोलावलं गेलं. पूर्ण वर्षभर या महानाट्याच्या प्रकल्पासाठी शाळा ‘शिवाजीमय’ होऊन गेली होती. एका महान राष्ट्रनेत्याच्या विविध पैलूंचे संस्कार कळत- नकळत विद्यार्थी - शिक्षकांवर होत होते.

अगदी सुरुवातीला वर्गावर्गांना विशिष्ट प्रसंग ठरवून दिले गेले. त्यासाठी ‘जाणता राजा’ च्या संहितेची ऑडिओ सीडी प्रत्येक वर्गशिक्षकाला दिली गेली. प्रत्येकाने ती ऐकून आपला प्रसंग लक्षात घेऊन, त्याचा वेळ, नाटकातील त्या प्रसंगाचं स्थान निश्चित लक्षात घेतलं. विद्यार्थी व शिक्षकांनी ही सीडी ऐकण्यासाठी आपापल्या पातळीवर टेपरेकॉर्डर, मोबाईल, अन्य व्यवस्था केल्या. कुणी असं म्हटलं नाही की अमुक एक गोष्ट उपलब्ध नाही. मी कसं ऐकू शकणार? इथूनच प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढण्याची सवय होत गेली आणि कठीण परिस्थितीचा ‘बाऊ’ न करण्याचा संस्कार झाला. दर शनिवारच्या एकत्रित बहुआयामी तासाला या शिवचरित्रातील प्रसंगांचं रोमहर्षक रसाळ विवेचन विद्यार्थ्यांसमोर करण्यात आलं. शिवचरित्र तनामनात मुरणं, वातावरणनिर्मिती होणं यामुळे सोपं झालं. मूळ संहितेतील काव्य विविध प्रकारची आहेत. कव्वाली, पोवाडा, कोळीगीत, स्फूर्तिगीत, भक्तीगीत, अभंग अशा सर्व काव्यांचं समीक्षणही केलं गेलं. याच तासाला नाटकातील दिंडी, कोळीगीत, गोंधळ, नृत्य, पोवाडे अशा सामूहिक नृत्यप्रकारांचा सराव घेतला गेला. गणेशोत्सवातील शालेय स्पर्धा या नाटकातील नृत्य आणि नाट्य प्रसंगांवर आधारित घेण्यात आल्या. एकाच वेळी अनेक उद्देश साध्य करणं यामुळे शक्य झालं.

कोणता प्रसंग प्रत्यक्ष नाटकात कधी आहे, त्याला तयारी काय लागेल, वेशभूषा, केशभूषा, युद्धाची साधने काय लागतील, वर्गातील कोणते विद्यार्थी कोणता भाग करणार, वैयक्तिक भूमिका आहे का अशा एक ना अनेक गोष्टींचा दूरगामीपणे विचार करून वर्गशिक्षकालाच या त्रुटींवर मात करायची होती. त्यासाठी पालकाची खूप मदत झाली. पालकांनी आपापल्या पाल्याच्या वर्गासाठी वेळ काढून, चौकशी करून मदत केली.

वैयक्तिक भूमिकांचा सराव हा शाळा भरण्याच्या आधी, नंतर, सुट्टीच्या दिवशी केला जात होता. शाळेचा नाट्यविभाग वैयक्तिक सरावाकडे अधिक लक्ष पुरवत होता. चित्रकला विभाग शाळेलाच नेपथ्याचा एक भाग बनवत होता. ऐतिहासिक किल्ल्याचे रूप घेतलेली शाळा हळूहळू साकारत होती. पगड्या, ढाली-तलवारी, मेणे, चिलखत असं सर्व बनवण्याच्या कार्यशाळा मुलांना स्वनिर्मितीचा आनंद देत होत्या. कागदाच्या लगद्यापासून हे सारं साहित्य बनवणं म्हणजे कार्यानुभव, हस्तकला, चित्रकला, शिल्पकला या सगळ्यांचा आदर्श वस्तुपाठच होता.

सृजनशक्तीचा विकास करणारं शिक्षण यापेक्षा वेगळं काय असू शकतं? एका वर्गाने स्वतःच्या डोक्यातून भन्नाट कल्पना काढत चक्क कागदाची चिलखतं बनवली. ती सजवली आणि प्रयोगाच्या वेळी परिधान केली. ड्रेपरी, मेकअप याचा वेगळा खर्च कोणालाही करावा लागला नाही. स्वतःच प्रत्येकाने शकल लढवून आपल्याला लागणारं वेषभूषा, साहित्य तयार केल. सर्वच कलाकार पारंपरिक शिवकालीन वेष धारण करणार होते. प्रत्येकाच्या डोक्याला काही ना काही शिरस्त्राण, आच्छादक वस्त्र असणार होतं. कुठेही जराही न्यून राहू नये याची प्रत्येकजण काळजी घेत होता. आयत्या वेळी कोणत्या समस्या येतील. अंधारात कुणी पडणार नाही ना, स्टेजवरची प्रॉपर्टी कोण ठेवणार, काम झाल्यावर ती कुठे ठेवायची इ. बारीक सारीक तपशीलाचा विचार करायला सर्वांनाच शिकवलं होतं. त्यामुळे संपूर्ण प्रयोगाच्या वेळी एकाही मुलाला किंवा कुणालाच साधं खरचटलंसुद्धा नाही. एका वेळी ३००-४०० विद्यार्थ्यांची दिंडी, राज्याभिषेक-सोहळा, औरंगजेबाची सेना इ. ये-जा करूनही अजिबात गोंधळ, गडबड न होता एन्ट्रीज आणि एक्झिटस् पार पडल्या.

भल्या भल्या नाटकांत आणि नाट्य दिग्दर्शकांना जे जमले नसेल ते इथे ५ वी ते १२ वी च्या वयोगटातील विद्यार्थ्यांनी करून दाखवलं. प्रसंगावधान, चातुर्य, जबाबदारी,कार्यनिष्ठा हे गुण अंगी बाणवल्याचंच हे द्योतक नाही का? मुद्दाम शिकवूनसुद्धा न दिसणारी आणि येणारी ही कौशल्यं एका नाट्यप्रयोगामुळे कायमची अंगी बाणली.

प्रत्येकजण शिवकाल जगत होता. मावळे झालेली मुलं एरवी शाळेत फिरतानाही ऐटीत चालत होती. शिवराय झालेले विद्यार्थी त्याच रुबाबात दिसत होते. मुख्य म्हणजे ‘जाणता राजा’ हे महानाट्य रेकॉर्डेड नाटकावर ओठांच्या हालचाली करण्याचं नाटक आहे. हे खूप कठीण काम अगदी रेकॉर्डेड संवादाबरोबर चपखल ओठांच्या हालचाली करून विद्यार्थ्यांनी सहजपणे करून दाखवलं.

व्यवस्थापकीय दृष्टिकोनातून या नाटकाचा विचार करता कामाची विभागणी आणि प्रत्येकाच्या नेतृत्वाला वाव, कामाचं विकेंद्रीकरण हा खूप महत्त्वाचा मुद्दा आहे. दिग्दर्शक त्यानंतर वर्ग, वर्गशिक्षक, विद्यार्थी, पालक असं विभागून काम दिल्यामुळे तयार होत गेलं. उदा. गोंधळ गीत दिलेल्या वर्गाने त्या नृत्यावरच आपलं लक्ष केंद्रित केलं, कव्वाली म्हणणाऱ्या मुलांनी त्या कव्वालीची पद्धत बिनचूक समजून घेतली. कोळी आणि वाघ्या यांच्या अभिनयात कुठेही बेगडीपणा आणि बटबटीतपणा वाटत नव्हता. आपल्या वाट्याला आलेल्या स्त्रीभूमिकाही मुलगे असून त्यांनी समरसून केल्या. अगदी आंबाड्यावर भरगच्च फुलांच्या वेण्या माळण्यापासून तुळशीबागेतले गळाभर दागिने घालण्यापर्यंत न लाजता सगळे छान नटले होते.

प्रत्येक गटासाठी लीडर्स तयार केल्यामुळे नियोजन काटेकोरपणे झालं. सराव घेताना तुकड्या-तुकड्यांनी सराव घेतला गेला. या साऱ्याला शेवटी शेवटी एक ठराविक तासिका दिली होती. त्यावेळी वेगळ्या वेगळ्या प्रसंगांची तालीम शाळेच्या फरसबंद चौकात होत होती. मुख्य म्हणजे हे सगळं करताना अगदी ५ वी च्या छोट्या मुलापासून १२ वी च्या मुलांपर्यंत, शिक्षकांपासून शिपायांपर्यंत आणि मुख्याध्यापकांपासून शालासमिती अध्यक्षांपर्यंत सगळेजण पूर्णपणे ताकदीनिशी एकत्र आले. सर्वांच्या मनामनातलं अंतर कमी झालं. शाळा जणू काही एकसंध झाली. शाळेचे सेवक, शिक्षक अगदी मुख्याध्यापक आणि शालासमिती अध्यक्षही एकाच प्रसंगात शिवरायांच्या अष्टप्रधानांच्या भूमिका करतात ही एकमेकातील अंतर नाहीसं करण्यासाठी महत्त्वाची गोष्ट ठरली.

विद्यार्थी आणि शिक्षकांवर नाटकातील प्रसंगांचे झालेले संस्कार हा त्या कलाकारांचा आयुष्यभराचा ठेवा आहे. शिवचरित्र नुसतं वाचून, अभ्यासून, पाठ करून काय उपयोग? ते प्रत्यक्ष आचरणात आणणं महत्त्वाचं आहे.

शाळेत झाडाची फांदी डोक्यावर पडून वॉचमन जायबंदी झाला होता. बालशिवाजीची भूमिका साकारणारा मंथन महाडिक याला चित्रपटात काम मिळालं. त्याला मिळालेली मानधनाची पहिली रक्कम त्याने वॉचमनच्या दवाखान्याच्या खर्चासाठी आपणहून आणून दिली. जाणता राजासारख्या उपक्रमाचे संस्कार असे खोलवर रुजत गेले.

मावळ्यांच काम करणारा सेवक नेहमीच अदबीनं बोलू लागला. शिवरायांचं काम करणारे शिक्षक आणखीनच सौजन्यशील भाषा वापरू लागले. जिजाबाईंचं काम करणाऱ्या शिक्षिका आपल्या वर्गातील विद्यार्थ्यांकडे पूर्वीपेक्षा अपत्यवत प्रेमाने पाहू लागल्या, हे त्या त्या भूमिकेचे आणि प्रसंगांचे मोठेपण आणि संस्कार नव्हेत काय? एका वर्गातील एका अपंग मुलालाही एका समूहप्रसंगात साजेशी भूमिका करायला मिळाली त्याचा कोण आनंद झाला!

छत्रपती शिवरायांचे धोरण, मुत्सद्दीपणा, प्रतिकूलतेवर मात करण्याचं कसब, नियोजन, चातुर्य, युक्ती, प्रसंगावधान, नेतृत्व, साहस, रुबाब, दक्षता हे गुण खऱ्या अर्थाने अंगी बाणले ते या महानाट्यामुळेच! व्यक्तिमत्त्वाचा विकास होणं म्हणजे वेगळं काय असतं? आणखी एक महत्त्वाची आणि सकारात्मक बाजू म्हणजे वर्षभर या प्रकल्पाच्या निमित्ताने प्रत्येकजण इतका व्यग्र होता की शाळेत विद्यार्थ्यांच्या परस्पर मारामाऱ्या, चोऱ्या किंवा शालेय साहित्याची मोडतोड हे प्रकार अजिबात घडले नाहीत. एरवी त्रासदायक आणि खोडकर असणारे विद्यार्थीही या नाटकामुळे गुंतून गेले होते, त्यामुळे अशा खोड्या आणि विध्वंसक गोष्टी झाल्या नाहीत. त्यांची ऊर्जा सकारात्मक गोष्टींसाठी वापरली गेली, अशी कायमच आपण वापरू लागलो तर!

प्रत्यक्ष प्रयोगाच्या दिवशी १७ डिसेंबर २०१३ रोजी दिलेल्या वेळी सगळी शाळा १००% उपस्थित होती! अधिक प्रेक्षक म्हणून पालक, हितचिंतक, पाहुणे, शिक्षण, कला, सामजिक क्षेत्रातील मान्यवर यांच्यासह हजारोंच्या संख्येने प्रेक्षक उपस्थित होते. पण सर्व काही सुनियोजित, सुरळीतपणे पार पडलं. दंगाधोपा, आरडाओरडा, अपघात, ताणतणाव, रागरुसवे, गैरसमज काही म्हणता काहीही झालं नाही. उत्तम नियोजन, येणाऱ्या अडचणींचा अगोदरच घेतलेला वेध आणि त्यादृष्टीने केलेली चोख तयारी, प्रत्येकाने जबाबदारीच्या जाणिवेने आणि आपलेपणाने केलेलं काम आणि मुख्य म्हणजे छत्रपती शिवरायांप्रती असलेली निष्ठा आणि भक्ती यामुळे एक प्रचंड मोठं शिवधनुष्य लीलया पेलणं शक्य झालं.

वर्षभर शाळेच्या सर्व बाह्यफलकांवर या महानाट्यातील काही महत्त्वाची वाक्ये, सुविचार, संवाद लिहून ठेवले गेले. 'स्त्री ही मराठ्यांच्या देव्हाऱ्यातील देवता आहे', 'भ्रष्टाचाऱ्यांचे नाते फक्त गिधाडांशी' अशी वचनं लिहून ठेवल्यामुळे नकळतच योग्य काय अयोग्य काय हे मनामनावर बिंबलं गेलं. वर्षभर शिवरायांची स्वा. सावरकरांनी लिहिलेली आरती सामूहिकरित्या म्हटली गेली. गणेशोत्सवही 'जाणता राजा' याच संकल्पनेवर आधारित घेतला आणि वार्षिक स्नेहसंमेलन म्हणजेच हे प्रत्यक्ष महानाट्य म्हणून साजरं केलं गेलं. सर्वच दृष्टीने पूर्णपणे शैक्षणिक, राष्ट्रभक्तीयुक्त, संस्कारक्षम, व्यक्तिमत्त्व विकास करणारा असा हा आगळावेगळा महाप्रकल्प साऱ्या पुणे शहराला, महाराष्ट्राला दीपवून टाकणारा ठरला. सर्व वृत्तपत्रं, आकाशवाणी, दूरचित्रवाहिन्या यांनी अक्षरक्षः उचलून धरलेल्या आणि डोक्यावर घेतलेल्या या महाप्रयोगाला प्रत्यक्ष लेखक शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे प्रयोगातील एक कलाकार म्हणून उपस्थित राहिले आणि त्यांनी दिलेली शाबासकीची थाप आम्ही सर्वांच्या परमभाग्याचा ठेवा होता. 'न भूतो न भविष्यति' अशा या महानाट्याने शालेय आणि सांस्कृतिक जगतात एक चिरंतन ठसा उमटवला.


**सौ. चारुता प्रभुदेसाई**
न्यू इंग्लिश स्कूल, रमणबाग, पुणे

रवींद्रनाथ ठाकूर आणि शांतीनिकेतन

गुरुदेव रवींद्रनाथ टागोर हे प्रतिभावंत कवी, लेखक, तत्त्वज्ञ आणि अध्यापक होते. अनेक प्रयोगशील उपक्रम त्यांनी शांतीनिकेतन येथे राबविले. आपल्या शिक्षणाचा आर्थिक, बौद्धिक, सौंदर्यात्मक, सामाजिक, आध्यात्मिक अशा आपल्या संपूर्ण जीवनाशी संबंध असला पाहिजे आणि आपली विद्यालये समाजाच्या हृदयाशी तऱ्हेतऱ्हेच्या देवाणघेवाणीच्या सहकार्याच्या बंधनांनी निगडित झाली पाहिजेत. या विचाराने शांतीनिकेतनची स्थापना केली.


शिक्षण हे जिवंत असावे आणि ते आपल्याला जीवनाच्या विविध अनुभवांतून मिळावे या उद्देशाने गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांनी बंदिस्त शाळेच्या 'भिंती' मोडून 'शांतीनिकेतन'ची स्थापना केली.
















For more details visit: www.bookganga.com

## Power Point Show for History












## शिक्षक प्रबोधन मंच

**‘मनुष्य घडणीसाठी शिक्षण’**

ज्ञान प्रबोधिनीच्या शैक्षणिक साधन आणि प्रशिक्षण केंद्रामार्फत शिक्षणात सकारात्मक उद्दिष्टाने शैक्षणिक प्रयोग करणाऱ्या कार्यकर्ते शिक्षकांसाठी ‘शिक्षक प्रबोधन मंच’ स्थापन करण्यात आला. शैक्षणिक विचार व अनुभव यांची देवाणघेवाण करण्यासाठीचे व्यासपीठ उपलब्ध करुन देणे ही ‘शिक्षक प्रबोधन मंचाच्या’ स्थापने मागची भूमिका आहे.

‘शिक्षक प्रबोधन मंचाची’ स्थापना १७ डिसेंबर २०१४ रोजी झाली. या निमित्त ‘मनुष्यघडणीसाठी शिक्षण’ या विषयावर ज्ञान प्रबोधिनीचे संचालक वाच. गिरीशरावांनी मनुष्य घडणीच्या वस्तुनिष्ठ प्रक्रिया व त्या प्रक्रिया बद्दलची उपक्रमशीलता विषद केली.

मनुष्य घडणीच्या बारा प्रक्रियांच्या परिचय करुन घेण्यासाठी पुढील संकेत स्थळाला भेट द्या व सविस्तर पहा ‘मनुष्य घडणीसाठी शिक्षण’.

### शिक्षक प्रबोधन मंच, द्वितीय पुष्प

दिनांक :२१ जानेवारी २०१५ वेळ : दु. ३.३० ते सायं.५.००
ठिकाण : प्रबोध सभागृह, ज्ञान प्रबोधिनी, ५१४, सदाशिव पेठ, पुणे ३०
प्रमुख वक्ते : श्री. मिलिंद चिंदरकर
विषय: ‘इस्त्रायलमधील शिक्षण – काही निरीक्षणे’
संपर्क . सौ. गीता साठ्ये ०२०-२४२०७१९३

## Website Links

**चित्रफित**

Shantiniketan - The Abode of Peace

www.youtube.com/watch?v=cyN9PF3eQek

Amader Shantiniketan song

www.youtube.com/watch?v=yd_mxXOhL20

**रवींद्रनाथ राष्ट्रगीत गाताना**

www.youtube.com/watch?v=jnsF7uy8KPo

RABINDRANATH TAGORE (1961,Documentary) - by Satyajit Ray

www.youtube.com/watch?v=SPqQ7-XuLeA

॥ राष्ट्रदेवा: भवेम ॥


**ज्ञान प्रबोधिनी शैक्षणिक साधन केंद्र**

पत्ता : 'विनायक भवन', ५१४ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०.

✆ २४२०७१९३, २४२०७१९४

E-mail: erc@jnanaprabodhini.org

**Visit us at: www.erc-pune.org**